# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक २४/०२/२०२५ रोजी प्राप्त तसेच
## दिनांक २४/०३/२०२५ रोजी मंजुर सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत

**(प्रशासकीय विषय)**

विषय क्रमांक २१४ – महानगरपालिका हिंदी शाळा क्रमांक १२ येथे बालवाडी वर्ग सुरु करण्या बाबत

ठराव क्रमांक २१४ – नगर विकास विभागाचे मा.अवर सचिव यांचे पत्र क्रमांक माबकओ २०२२/अनीसं क्र./९२५/मवि-२८ दिनांक १३ डिसेंबर २०२२ चे निर्देशान्वये अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अंगणवाडी नसलेल्या भागात एबाप्र अधिकारी (नागरी) यांचे सहकार्य घेवुन बालवाडी सुरु करण्याचे निर्देश होते. ठराव क्रमांक ९७ मध्ये सदर शाळेमध्ये बालवाडी वर्ग सुरु करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली होती. परंतु मनपा उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्र. ०८ जमील कॉलनी येथे KG 1, KG 2 चे वर्ग सुरु असुन सदर वर्गामध्ये एकुण २२५ विद्यार्थी शिकत असल्यामुळे बालवाडी वर्ग सुरु करता येणार नाही असे पत्र मा.मुख्याध्यापक यांनी कार्यालयात सादर केले आहे. सदर बालवाडी त्याच भागातील मनपा हिन्दी शाळा क्रमांक १२ येथे सुरु करण्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १०/१०/२०२४ रोजी मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

दिनांक ०४/०७/२०२३ रोजी प्राप्त प्रशासकीय ठराव क्रमांक ९७ मध्ये उर्दु उच्च प्राथ. शाळा क्र.०८ जमील कॉलनी येथील बालवाडी वर्ग सुरु करण्यास मंजुरी प्रदान झाली असुन वर नमुद कारणास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. या दृष्टीने सदर उर्दु उच्च प्राथ. शाळा क्र. ०८ जमील कॉलनी ऐवजी मनपा हिन्दी शाळा क्रमांक १२ येथे बालवाडी वर्ग सुरु करण्यास सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी प्रदान होण्यास प्रशासकीय टिपणी सादर करण्यात येते आहे.

बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांची नियुक्ती शाळा व्यवस्थापन स्तरावरुन करण्यात येईल. तसेच त्यांचे आहार, वेळ, साहित्य, गणवेश व इतर बाबीवर महिला बाल कल्याण विभाग यांचेकडुन कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सदर सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी प्रदान होण्यास प्रशासकीय विषय सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव मंजुर व कायम**

| | |
|---|---|
| स्वा./- | स्वा./- |
| नगरसचिव | प्रशासक |
| महानगरपालिका, अमरावती | महानगरपालिका,अमरावती |

महानगरपालिका, अमरावती